# देशाचा अन्नदाता शेतकरीच उपाशी

## श्रीपाल सबनीस : कुंडलमध्ये क्रांतिअग्रणी व्याख्यानमाला

कुंडल : भाकरी देणाऱ्या शेतकऱ्यावरच आज उपाशी राहण्याची वेळ आली असून, शासन शेती आणि शेतकरी यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करीत असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. कुंडल (ता. पलूस) येथे क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते.

श्रीपाल सबनीस म्हणाले, कारखानदारी सहकारी आहे तोपर्यंतच टिकते आणि शेतकऱ्यांच्या हिताची असते. सहकार टिकला पाहिजे, तरच देश टिकेल. कारण सहकार तळातील लोकांसाठी काम करत असतो. भारतातील अंतर्गत कलह मिटविणे आवश्यक आहे. विश्वशांतीच्या प्रकाशात भारताची प्रगती होऊ शकेल. प्रबोधनाची सूत्रे ही वैश्विक स्वरुपाची मांडणे आवश्यक आहे.

जिहादविषयी बोलताना त्यांनी, विकारांच्या विरुध्द लढणे म्हणजे




क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांच्या जयंतीनिमित्त श्रीपाल सबनीस यांचे व्याख्यान झाले. यावेळी किरण लाड उपस्थित होते.

जिहाद असल्याचे सांगितले. जातीव्यवस्थेवरही त्यांनी मार्मिक पध्दतीने टीकास्त्र सोडले. समाजाचे प्रबोधन परिपूर्ण झाले, तरच सर्वांगीण प्रगती शक्य आहे. राजकीय सत्तेसाठी समाजप्रबोधनाचे सूत्र पायदळी तुडविले जात असून राजकारणाची भाकरी त्यांच्या निखाऱ्यांवर भाजत आहेत. कोणत्याही महापुरुषाला जात आणि धर्म नसतो. स्त्रियांचे दु:ख सर्व धर्मात सारखेच आहे. यासाठी समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी श्रमिक आणि दलित यांनी एकत्र येणे आवश्यक असून, धर्मनिरपेक्षता जपणे ही काळाची गरज त्यासाठी कोणतीही तडजोडीची गरज नसल्याचे ते म्हणाले.

यावेळी क्रांती उद्योग समूहाचे प्रमुख अरुण लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, जिल्हा राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद लाड, व्ही. वाय. पाटील, राजेंद्र लाड, रणजित लाड, उद्योजक उदय लाड, सरपंच सुलोचनाताई कुंभार, जगन्नाथ आवटे, जे. पी. लाड, गांधी एज्युकेशन सोसायटीचे सचिव शहाजी लाड, वसंतराव लाड, सुनील गुरव, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, कुंडलिक एडके, मुकुंद जोशी, कॉ. सुभाष पवार, अशोक पवार आदींसह परिसरातून नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सर्जेराव खरात यांनी, तर चंद्रकांत जाधव यांनी स्वागत केले. एन. पी. जाधव यांनी सूत्रसंचालन केले, वैभव लाड यांनी आभार मानले. (वार्ताहर)

# शेतकरी संघटनेकडून भोसले यांचा सत्कार

शिरटे : य. मो. कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले यांनी एफ.आर.पी.व्यतिरिक्त ३०० रुपये जादा, अशी सर्वाधिक २६०० रुपये इतकी पहिली उचल जाहीर केल्याबद्दल स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून सुरेश भोसले यांचा कारखाना कार्यस्थळावर सत्कार करण्यात आला. यावेळी सातारा जिल्हा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अर्जुन साळुंखे, कऱ्हाड तालुकाध्यक्ष देवानंद पाटील, धनाजी मोरे यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. भोसले यांचा सत्कार केला.

यावेळी साळुंखे म्हणाले, डॉ. भोसले यांनी सर्वाधिक पहिली उचल देण्याचा घेतलेला निर्णय हा दिलासा देणारा आहे. शासन, कारखानदार व शेतकरी संघटनेच्या कोल्हापूर व सांगली येथील बैठकीत एफ.आर.पी. अधिक १७५ असा ऊस दराचा फॉर्म्युला ठरविला आहे. यावेळी पांडुरंग होनमाने, जगदीश हरळीकर, विनायक भोसले, अल्लाउद्दीन इनामदार, राजू शेळके, बापूसाहेब साळुंखे, प्रदीप मोहिते, विकास पाटील उपस्थित होते. (वार्ताहर)

02/12/16 लोकमत